# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१८
# भूगोल आणि अर्थशास्त्र

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना:**
i. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.
ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
iii. आलेख कागदाचा वापर प्रश्न क्र. 3 (अ) साठी करावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडा.
iv. भारताच्या नकाशा आराखड्याचा वापर प्रश्न क्र. 3 (क) साठी करावा आणि तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडा.
v. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.

**1. (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा.** **[3]**

1. क्षेत्रफळाच्या दृष्टीने ________ हे सर्वांत लहान राज्य आहे.
(मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, गोवा)

2. ________ या संकरित मेंढीची लोकर उच्च प्रतीची मानली जाते.
(चोकला, पुंगल, मारवाडी, मालपुरी)

3. ब्रह्मपुत्रेची भारतातील प्रमुख उपनदी ________ ही आहे.
(कोसी, शोण, हुगळी, सुबनसिरी)

**(ब) 'अ ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा.** **[3]**

| | स्तंभ 'अ' | | स्तंभ 'ब' |
|---|---|---|---|
| i. | अतिप्राचीन भूभाग | अ. | थंड हवेचे ठिकाण |
| ii. | कायल | ब. | सांभर सरोवर |
| iii. | सापुतारा | क. | द्वीपकल्पीय पठार |
| | | ड. | मलबार किनारा |

**2. (अ) भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन).** **[4]**

1. हिमालय हा भारतातील हवामान स्थिती निश्चित करतो.
2. पंजाब प्रदेश क्षारयुक्त होत आहे.
3. छोटा नागपूर पठारावर खाणकाम मोठ्या प्रमाणावर विकसित झाले आहे.
4. अंदमान-निकोबार बेटावर पर्जन्याचे प्रमाण जास्त आहे.

**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही दोन).** **[4]**

1. उत्तरेकडील मैदानी प्रदेशाची वैशिष्ट्ये
2. शिवालिक रांग
3. पूर्व किनारी मैदानातील शेती

3. (अ) **खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्तंभालेख काढा :** **[2]**

| वर्ष | साखर उत्पादन (लाख टन) |
|---|---|
| 2000-01 | 95 |
| 2001-02 | 130 |
| 2002-03 | 180 |
| 2003-04 | 160 |
| 2004-05 | 125 |

(ब) **खाली दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन).** **[2]**




**प्रश्न :**

1. नकाशाचे शीर्षक लिहा.
2. जम्मू-काश्मीर राज्यातील लिंग गुणोत्तर किती आहे?
3. सर्वाधिक लिंग गुणोत्तर असलेले राज्य कोणते?
4. ईशान्य भारतातील 920 लिंग गुणोत्तर असलेले राज्य कोणते?

(क) **तुम्हांस पुरवलेल्या भारताच्या आराखड्यात पुढील बाबी दाखवा व त्यांना नावे द्या. (सूची आवश्यक आहे.) (कोणतेही दोन).** **[2]**

1. वुलर सरोवर
2. पश्चिम घाट
3. चेन्नई
4. लक्षद्वीप

**4. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन).** **[8]**

1. "पूर्वीय मैदानी प्रदेशातील जैवविविधता" याविषयी सविस्तर माहिती लिहा.
2. दख्खनच्या पठारावरील शेती व्यवसायाची सविस्तर माहिती लिहा.
3. राजस्थानच्या मैदानी प्रदेशातील नैसर्गिक वनस्पतीविषयी सविस्तर माहिती लिहा.

**5. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** **[2]**

1. _______ क्षेत्र हे कृषी क्षेत्र म्हणूनही ओळखले जाते.

   (प्राथमिक, द्वितियक, तृतियक)

2. सामाजिक कल्याण साधणे हा _______ या अर्थव्यवस्थेचा मुख्य हेतू असतो.

   (भांडवलशाही, मिश्र, समाजवादी)

**6. प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही तीन).** **[6]**

1. श्रमप्रधान तंत्र कशास म्हणतात?
2. भाववाढीची मुख्य दोन कारणे लिहा.
3. तुटीचा अर्थभरणा म्हणजे काय?
4. सार्वजनिक वितरण प्रणालीची मुख्य उद्‌दिष्ट्ये कोणती?
5. सार्वजनिक वितरण प्रणालीतील दोन उणिवा लिहा.

**7. पुढील प्रश्नांची पाच किंवा सहा वाक्यांत उत्तरे लिहा (कोणताही एक).** **[4]**

1. ग्राहकाची कर्तव्ये स्पष्ट करा.
2. भाववाढीचे वितरणावर होणारे परिणाम स्पष्ट करा.